MHWS08000665-2019

## निशाणी ६७ वरील आदेश

१. प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र.२,३,५ व ६ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे लेखी कैफियतीमध्ये दुरुस्ती करिता दाखल केला आहे.

२. सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द वाटपाकरिता व स्वतंत्र ताब्याकरिता दाखल केला आहे. प्रतिवादीचे असे कथन की, वादीने नि.क्र.६३ नुसार दाव्यामध्ये दुरुस्ती केलेली आहे. त्याअनुषंगाने सदर प्रतिवादी हे त्यांचे लेखी कैफियत परिच्छेद क्र.५ नंतर ५-अ मध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करणे जरुरी आहे. त्यामुळे दाव्यामध्ये कोणताही बदल होणार नाही. याउलट वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही, त्यामुळे प्रतिवादींनी प्रस्तुत दुरूस्ती मंजूर होण्याची विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादी यांचे म्हणणे मागविण्यात आले. सदर अर्जास वादीने विरोध दर्शविला आहे.

४. खालील मुद्दे या अर्जाच्या निकालासाठी उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष खालील कारणमिमांसेच्या आधारे देण्यात आले.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादीने मागणी केलेल्या अर्जानुसार दुरुस्ती करू शकतो काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## ***का र ण मि मां सा***

**मुद्दा नं. १ चे संदर्भात -**

**५.** वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील अर्ज, त्यावरील म्हणणे, कागदपत्रे व एकंदर परिस्थिती विचारात घेता असे निदर्शनास येते की सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द वाटपाकरिता व स्वतंत्र ताब्याकरिता दाखल केला आहे.

**६.** कायद्याच्या प्रस्थापित तत्वानूसार दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दुरूस्ती अर्ज विचारात घेताना दाव्याच्या गुणावगुणाचा विचार करणे अपेक्षित नाही. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चा मुळ हेतू असा आहे की वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचा मुळ मुद्दा शोधून काढण्यासाठी खरी परिस्थिती अभिलेखावर आणून योग्य व न्याय दुरुस्ती करणे. न्यायाकरिता दाव्यामध्ये कधीही दुरूस्ती करण्याची परवानगी देण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. जर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरूपात काही बदल होत नसेल तर दावा दुरूस्ती मान्य करण्यात यावी असे करत असताना विरूद्ध पक्षकारास पुरेशी भरपाई देण्याबाबत विचार करावा तसेच दाव्याचे अनेकीकरण टाळून वादी व प्रतिवादी यांच्यातील दाव्याची संख्या मर्यादीत ठेवण्याच्या दृष्टीने दुरूस्ती मंजूर करणे न्यायोचित असते.

**७.** प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द वाटपाकरिता व स्वतंत्र ताब्याकरिता दाखल केला आहे. वादीने नि.क्र.६३ मधील आदेशानुसार दाव्यामध्ये दुरुस्ती केली आहे. सदर दुरुस्तीच्या अनुषंगाने प्रतिवादी त्यांच्या कैफियतीमध्ये दुरुस्ती करु पाहत आहेत. सदर दुरुस्तीच्या अनुषंगाने प्रतिवादीला त्यांचे लेखी कैफियतीमध्ये दुरुस्ती करता येणार आहे. सदर दुरुस्तीने दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच दाव्याचे अनेकीकरण न होता दाव्याची संख्या मर्यादीत ठेवण्यासाठी प्रस्तुतची दुरूस्ती करणे न्यायोचीत वाटते. त्यामुळे अभिलेखावरील वस्तुस्थिती विचारात घेता सदरील अर्जामध्ये तथ्य आहे असे मला वाटते. त्यामुळे सदर अर्ज मंजुर करुन मुद्दा

क्र.१ चे उत्तर होकारार्थी लिहून मुद्दा क्र.२ करिता पुढील आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

**१.** अर्ज नि.क्र.६७ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** अर्जात नमुद केलेली दुरुस्ती आज रोजी अथवा पुढील नेमलेल्या तारखेच्या आत करण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर)

DINESH MUKUND GAIKWAD

Digitally signed by DINESH MUKUND GAIKWAD
Date: 2025.06.17 17:57:53 +0530

( दिनेश मु. गायकवाड )

दि.१७/०६/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order are same word to word, as per the original Order.

Name of the Stenographer : B. V. Bhisade, (Grade-III)

Name of court : Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Risod.

Date : 17.06.2025

Order signed by the Presiding Officer : 17.06.2025

Order uploaded on : 18.06.2025